**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण**
**जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे**

**टोल फ्री क्रमांक :१०७७ दुरध्वनी क्रमांक :०२०-२६१२३३७१, Email id -collector.pune@maharashtra.gov.in**

जि.का./क्रं.आ.व्य./कावि/ १४९५ /२०२१ दिनांक :- ०५/०६/२०२१

**वाचले :-** १. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, १८९७,
२. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.
३. फौजदारी प्रकिया संहिता, १९७३
४. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील क्रमांक करोना २०२०/ग. फ्र. ५८/आरोग्य-५,दि.१३/०३/२०२०, १४/०३/२०२० तसेच १५/०३/२०२० रोगीच्या अधिसुचना.
५. महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना No.DMU/२०२०/CR.९२/DisM-१ दिनांक २३ व २४ मार्च २०२०.
६. मा. मुख्य सचिव,आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील No.DMU/2020 / CR.92/DisM-१ दि.२९/०१/२०२१, दि.१५/०३/२०२१, दि.०४/०४/२०२१, दि.१३/०४/२०२१, दि.२०/०४/२०२१, दि.२१/०४/२०२१ रोजीचे आदेश.
७. या कार्यालयाकडील क्रं.जि.का./आ.व्य/कावि/१५८,२४२,३४१,३६२,४९६,५६७,४८८,५९५,६७२,९७३,९९३,१२४८ दि.१८.०२.२०२१, १२.०३.२०२१, २७.०३.२०२१ , ०२.०४.२०२१,०५.०४.२०२१ ,१४.०४.२०२१, २०.०४.२०२१ ,२२.०४.२०२१ , २९.०४.२०२१, १३.५.२०२१ , १४.५.२१, २८.५.२०२१ व ३१.०५.२०२१ रोजीचे आदेश
८. मा.मुख्य सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील No. DMU/2020/CR.92 /DisM-१. दिनांक २९/०४/२०२१ रोजीचे आदेश
९. मा.मुख्य सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील No. DMU/2020/CR.92 /DisM-१. दिनांक १२/०५/२०२१ रोजीचे आदेश
१०. मा.मुख्य सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील No. DMU/2020/CR.92 /DisM-१. दिनांक ३०/०५/२०२१ रोजीचे आदेश
११. मा.मुख्य सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील No. DMU/2020/CR.92 /DisM-१. दिनांक ०४/०६/२०२१ रोजीचे आदेश

---

**विषय :- कोरोना विषाणू (कोविड-१९) संसर्ग साखळी तोडण्यासाठी "Levels of Restrictions for Breaking the Chain" प्रतिबंधात्मक आदेश.**

**आदेश :-**

**ज्याअर्थी,** आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोट कलम २(अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत.

**ज्याअर्थी,** राज्य शासनाने वाचले क्रं. ०४ अन्वये कोरोना विषाणूचा (कोविड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक अधिनियम १८९७ दि. १३ मार्च २०२० पासून लागू करून २.३.४ मधील तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी अधिसूचना निर्गमित केलेली आहे, त्याबाबतची नियमावली प्रसिद्ध केली असुन जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषित केलेले आहे.

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र शासनाकडील उपरोक्त वाचले क्र. १० अन्वये कोव्हीड-१९ प्रतिबंधात्मक उपाययोजने अंतर्गत "(Break The Chain)" प्रतिबंधात्मक आदेशास दिनांक ०१/०६/२०२१ रोजीचे सकाळी ०७.०० वा पासून ते दिनांक १५/०६/२०२१ रोजीचे सकाळी ०७.०० वा. पर्यंत मुदतवाढ देणेत आलेली आहे.

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र शासनाकडील उपरोक्त वाचले क्र. ११ अन्वये कोरोना विषाणू (कोविड-१९) संसर्ग साखळी तोडण्यासाठी **"(Break The Chain)"** बाबत मर्यादित निर्बंधस्तर जिल्हानिहाय घोषित करणेत आलेले आहेत. त्यानुसार पुणे जिल्हा ग्रामीण कार्यक्षेत्राचा समावेश मर्यादित निर्बंधस्तर – ४ मध्ये होत आहे. तसेच पुणे व खडकी छावणी परिषद कार्यक्षेत्राचा समावेश पुणे महानगरपालिका हद्दीजवळ व देहू रोड छावणी परिषद कार्यक्षेत्राचा समावेश पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीजवळील क्षेत्रात होत आहे.

**त्याअर्थी, मी डॉ.राजेश देशमुख, जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,पुणे** जिल्हा ग्रामीण कार्य क्षेत्रातील कोव्हीड-19 सरासरी पॉझिटीव्हीटी दर हा 12.6% असून ऑक्सीजन बेड ऑक्युपन्सी 31.57% आहे. त्यामुळे पुणे जिल्हा ग्रामीण कार्यक्षेत्रातील **सर्व क्षेत्र ग्रामपंचायत, नगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत हद्दीत** प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणुन मर्यादित निर्बंधस्तर - 4 प्राप्त अधिकारान्वये खालीलप्रमाणे लागू करीत आहे.

1. **पुणे व खडकी छावणी परिषद** - पुणे व खडकी छावणी परिषद कार्यक्षेत्र पुणे महानगरपालिका हद्दीजवळ येत असल्याने आयुक्त पुणे महानगरपालिका यांचे आदेशातील अटी व शर्तीचे अधिन राहून छावणी परिषद हद्दीतील सर्व उपक्रम व कृतींना परवानगी राहील.
2. **देहू रोड छावणी परिषद** - देहू रोड छावणी परिषद कार्यक्षेत्र पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीजवळ येत असल्याने आयुक्त पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांचे आदेशातील अटी व शर्तीचे अधिन राहून छावणी परिषद हद्दीतील सर्व उपक्रम व कृतींना परवानगी राहील.
3. वरीलप्रमाणे क्षेत्र वगळता **जिल्ह्याचे उर्वरित कार्यक्षेत्र सर्व ग्रामपंचायत, नगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत** हद्दीत मा. मुख्य सचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचनेत मर्यादित निर्बंधस्तर - 4 नुसार परवानगी देण्यात आलेल्या सर्व उपक्रम व कृतींना अधिसुचनेतील अटी व शर्तीच्या अधिन राहून परवानगी राहील.

**मर्यादित निर्बंधस्तर — 4 मधील बाबींचा तपशील**

| अ.क्र. | आस्थापना/सेवा/उपक्रम/बाब /तपशील | मर्यादित निर्बंधस्तर ४ नुसार निर्बंध/सुट बाबत सुचना |
|---|---|---|
| 1. | अत्यावश्यक वस्तु व सेवा संबंधीत सर्व दुकाने व आस्थापना | सर्व दिवशी दुपारी 04.00 वा. पर्यंत सुरु राहतील. |
| 2. | अत्यावश्यक वस्तु व सेवा वगळता इतर सर्व दुकान व आस्थापना | बंद राहतील. |
| 3. | मॉल्स, सिनेमा हॉल (मल्टी प्लेक्स व सिंगल स्क्रिन सह), नाटयगृह | बंद राहतील. |
| 4. | रेस्टॉरंटस, हॉटेल, उपहारगृहे, खानावळी, शिवभोजन थाळी | फक्त पार्सल सेवा / घेवून जाणेसाठी आणि होम डिलीव्हरी सेवा सुरु राहतील. |
| 5. | लोकल ट्रेन्स | मर्यादित स्वरुपात- वैद्यकिय आणि काही अत्यावश्यक सेवाकरिता. |
| 6. | सार्वजनिक ठिकाणे / / खुली मैदाने / चालणे / सायकलींग | सोमवार ते शुक्रवार सकाळी 05.00 वा. ते सकाळी 09.00 वा. पर्यंत सुरु राहतील. दर शनिवार व रविवारी बंद राहतील. |
| 7. | खाजगी आस्थापना / कार्यालये | <u>सुट देणेत आलेल्या बाबी / आस्थापना</u> —<br>a) केंद्रीय, राज्य आणि स्थानिक प्रशासनाची सर्व कार्यालये आणि त्यामध्ये समाविष्ठ असलेली सर्व संविधानीक प्राधिकरणे व संस्था.<br>b) सहकारी, सार्वजनिक आणि खाजगी बॅका, सार्वजनिक उपक्रम.<br>c) अत्यावश्यक सेवा पुरवठा करणाऱ्या कंपन्यांची सर्व कार्यालये.<br>d) विमा आणि मेडीक्लेम कार्यालये.<br>e) औषधे निर्मिती करणाऱ्या उद्योगांची कार्यालये जी, उत्पादनाच्या वितरणाशी संबंधित व्यवस्थापनाशी निगडीत आहेत.<br>f) रिझंर्व्ह बॅक ऑफ इंडीया यांचेमार्फत नियंत्रित स्वतंत्र कार्यकक्ष असलेले प्राथमिक वितरक, CCIL, NPCI, पेमेंट सिस्टीम ऑपरेटर्स आणि RBI कडून नियंत्रित बाजारामध्ये समाविष्ठ असलेले सर्व आर्थिक बाजार<br>g) सर्व नॉन बँकिंग वित्तीय महामंडळे<br>h) सर्व मायक्रो फायनान्स संस्था<br>i) मा. न्यायालय, मा. लवाद अथवा चौकशी आयोगाचे कामकाज सुरु असलेस त्यांचेशी संबंधित सर्व अधिवक्ता / वकिल यांची कार्यालये सुरु राहतील. |

| | | |
|---|---|---|
| 8. | कार्यालयीन उपस्थिती – शासकीय कार्यालयासहीत (सुट असलेली खाजगी कार्यालये) | 25% उपस्थितीसह सुरु राहतील. |
| 9. | खेळ | मैदानी खेळांना सोमवार ते शुक्रवार सकाळी 05.00 वा. ते सकाळी 09.00 वा. पर्यंत परवानगी असेल. दर शनिवार व रविवारी बंद राहतील. |
| 10. | चित्रीकरण | गर्दी नसणारे (crowd scenes)चित्रीकरण करणेस सोमवार ते शुक्रवार परवानगी राहील.<br>सायंकाळी 05.00 वा. नंतर बाहेर प्रवास / संचार करता येणार नाही आणि दर शनिवार व रविवारी बाहेर कोणताही संचार / प्रवास करता येणार नाही. |
| 11. | सामाजिक, धार्मिक, राजकीय आणि सांस्कृतिक / करमणुकीचे कार्यक्रम / मेळावे | बंद राहतील. |
| 12. | लग्नसमारंभ | जास्तीत जास्त 25 लोकांच्या उपस्थितीत |
| 13. | अंत्ययात्रा / अंतविधी | जास्तीत जास्त 20 लोकांच्या उपस्थितीत |
| 14. | बैठका / निवडणूक – स्थानिक स्वराज्य संस्था / सहकारी संस्था यांच्या सर्वसाधारण सभा | 50 % क्षमतेसह. |
| 15. | बांधकाम | ज्या ठिकाणी कामगारांच्या राहणेची सोय असेल अशी बांधकामे सुरु राहतील (Only onsite labours) |
| 16. | कृषि व कृषि पुरक सेवा | सोमवार ते शुक्रवार दुपारी 04.00 वा. पर्यंत सुरु राहतील. |
| 17. | ई कॉमर्स – वस्तू व सेवा | फक्त अत्यावश्यक सेवेत मोडणाऱ्या ई कॉमर्स सेवा सुरु राहतील (सर्व साधारण सुचनामधील मुद्दा क्र. 4 अत्यावश्यक सेवा – 1 ते 31 ). |
| 18. | जमावबंदी / संचारबंदी | जमावबंदी सकाळी 05.00 वा. पासून ते सायंकाळी 05.00 वा. पर्यंत सुरु राहील व त्यानंतर संचारबंदी सायंकाळी 05.00 वा. पासून सकाळी 05.00 वा. पर्यंत लागू राहील. |
| 19. | व्यायामशाळा, केशकर्तनालय दुकाने, ब्युटी पार्लरस, स्पा, वेलनेस सेंटर्स | सोमवार ते शुक्रवार दुपारी 04.00 वा. पर्यंत 50% क्षमतेसह सुरु राहतील. सदर ठिकाणी येणाऱ्या नागरिकांना पुर्व नियोजित वेळ ठरवूनच प्रवेश अनुज्ञेय राहील. तसेच ए.सी. चा वापर करणेस मनाई राहील. तसेच सदर ठिकाणी फक्त लसीकरण पूर्ण केलेल्या नागरिकानांच प्रवेश अनुज्ञेय राहील. |
| 20. | सार्वजनिक वाहतूक व्यवस्था (बसेस) | 50% क्षमतेसह सुरु राहतील (प्रवाशांना उभे राहून प्रवास करता येणार नाही). |
| 21. | कार्गो सेवा / माल वाहतूक (जास्तीत जास्त तीन व्यक्ती, चालक/मदतनीस/स्वच्छक किंवा इतर) प्रवाशांना लागू असलेल्या सर्व नियमांसह | नियमीत सुरु राहतील. |
| 22. | खाजगी वाहने/ टॅक्सी/ बसेस/ लांब पल्ल्याच्या रेल्वेद्वारे प्रवाशांचा अंतरजिल्हा प्रवास | नियमीत सुरु राहतील – परंतू सदर वाहनामधून मर्यादित निर्बंधस्तर - पाच मध्ये समाविष्ठ असलेल्या जिल्ह्यामध्ये प्रवाशी थांब्यावर उतरणार असलेस त्या प्रवाशास ई पास बंधनकारक असेल. |
| 23. | उत्पादक घटक – निर्यातीशी संबंधीत घटक निर्यात बंधन पूर्ण करण्याची आवश्यक असलेल्या एमएसएमई सह. | 50 % कर्मचारी क्षमतेसह, सदर कामगार बाहेरुन प्रवास करुन येणार असल्यास त्यांची प्रवासाची व्यवस्था स्वतंत्र वाहनातून करणेच्या अटीवर (ट्रान्सपोर्ट बबल) |

कारी ... पुणे

पुढे चालू

| | | |
|---|---|---|
| 24. | उत्पादक घटक –१. अत्यावश्यक माल उत्पादन करणारे घटक (अत्यावश्यक माल आणि घटक, कच्चा माल उत्पादन करणारे घटक/अत्यावश्यक मालासाठी आवश्यक असणारे आवेष्टन तयार करणारे घटक आणि सर्व पुरवठा साखळी घटक. 2. सर्व सतत प्रक्रिया सुरु असणारे उद्योग (असे घटक जे तात्काळ बंद करता येत नाहीत किंवा ठरविक वेळे शिवाय सुरु करता येत नाहीत.) 3.राष्ट्रीय सुरक्षा आणि संरक्षणासाठी महत्वपूर्ण असणाऱ्या वस्तूंचे उत्पादन घटक. ४. डाटा सेंटर/ क्लाऊड सर्व्हिस प्रोव्हायडर/आयटी सर्व्हिसेस गुंतागुंतीच्या पायाभूत सेवा सुविधांना आवश्यक असणार घटक | 50 % कर्मचारी क्षमतेसह, सदर कामगार बाहेरुन प्रवास करुन येणार असल्यास त्यांची प्रवासाची व्यवस्था स्वतंत्र वाहनातून करणेच्या अटीवर (ट्रान्सपोर्ट बबल) |
| 25. | उत्पादन घटक - इतर क्षेत्रातील सर्व उत्पादन घटक जे अत्यावश्यक सेवा, निरंतर प्रक्रिया उद्योग अथवा निर्यात करणारे घटक या मध्ये अंतभूत नसणारे सर्व उत्पादन घटक | 50 % कर्मचारी क्षमतेसह, जे कर्मचारी कामाच्या ठिकाणी सर्व राहणेची सोय असलेली किंवा कामाच्या ठिकाणा जवळच स्वतंत्र कॉलनी मध्ये राहणारे व ज्यांच्यासाठी स्वतंत्र वाहतूक व्यवस्था आहे असे कर्मचारी, बाहेरुन येणाऱ्या जास्तीत जास्त 10% व्यवस्थापकीय कर्मचारी यांच्यासह |

**सर्वसाधारण मार्गदर्शक सुचना –**

1) पुणे जिल्हा ग्रामीण कार्यक्षेत्राचा समावेश शासन अधिसुचनेतील मर्यादित निर्बंधस्तर- 4 मध्ये असलेने अत्यावश्यक सेवेतील दुकाने दुपारी 04.00 वा. पर्यंत सुरु राहतील. तसेच सदर ठिकाणी काम करणाऱ्या व्यक्ती किंवा सदर दुकानामधून सेवा घेणाऱ्या व्यक्ती यांना सायंकाळी 05.00 वा. नंतर हालचाल/प्रवास करणेस परवानगी असणार नाही.

2) शासन आदेशातील सुचनांनुसार ज्या-ज्या वेळी ई-पासची आवश्यकता आहे त्यावेळी वाहनात असणाऱ्या सर्व प्रवाशांना वैयक्तीक स्वतंत्र पास असणे आवश्यक आहे. प्रवाशांच्या वाहनांना स्वतंत्र पासची आवश्यकता असणार नाही.

3) कोविड-19 च्या व्यवस्थापनासाठी आवश्यक असणारी शासकीय कार्यालये आणि अत्यावश्यक सेवा देणाऱ्या आस्थापना ही 100% उपस्थितीसह सुरु राहतील.

4) <u>अत्यावश्यक सेवा मध्ये पुढील गोष्टीचा समावेश असेल –</u>

1. रुग्णालय, रोग निदान केंद्र, क्लिनिक्स, लसीकरण केंद्रे, वैद्यकीय विमा कार्यालये, औषध दुकाने, औषधे निर्मिती उद्योग इतर वैद्यकीय आणि आरोग्य सेवा यांचा त्यांना आवश्यक अशा अनुषंगीक उत्पादन आणि वितरण तसेच वितरक, वाहतुक आणि पुरवठा साखळी यांचा देखील समावेश असेल. लस, निर्जंतुके, मास्क, वैद्यकीय उपकरणे, त्यांना सहाय्यभुत कच्चा माल उद्योग आणि अनुषांगीक सेवा यांचे उत्पादन व वितरण यांचादेखील समावेश असेल.
2. शासकीय व खाजगी पशुवैद्यकीय सेवा / दवाखाने, ॲनिमल केअर सेंटर व पेट फुड शॉप.
3. वन विभागाने घोषित केल्यानुसार वनीकरण संबंधी सर्व कामकाज.
4. विमानचलन आणि संबंधीत सेवा (विमान कंपन्या, विमानतळ, देखभालदुरुस्ती, कार्गो, ग्राऊंड सर्व्हिसेस, केटरिंग, इंधन भरणे, सुरक्षा इ.)
5. किराणा सामान दुकाने, भाजीपाला दुकाने, फळविक्रेते, दुध डेअरी, बेकरी, मिठाई आणि सर्व प्रकारची खाद्य दुकाने (चिकन, मटन, मासे, अंडी आणि पोल्ट्री दुकाने), संस्था, शासकीय विभाग आणि वैयक्तिक करावयाच्या सर्व मान्सून पूर्व कामकाजासाठी आवश्यक साहित्याची दुकाने, छत्री दुरुस्ती करणारी दुकाने, प्लॅस्टीक शिट, ताडपत्री, रेनकोट इ. वस्तू विक्री आणि दुरुस्ती करणारी दुकाने तसेच दिनांक 15 मे ते 20 मे या

लक्ष्मी –

कालावधीतील चक्री वादळामुळे तसेच यापुढे येणाऱ्या मान्सुन कालावधी मध्ये घर तसेच इतर बांधकामे यांची दुरुस्ती तसेच सुरक्षितता यासाठी करावयाच्या उपाययोजनासाठी आवश्यक साहित्य विक्री करणारी दुकाने.

6. शितगृहे आणि साठवणूकीची गोदाम सेवा.
7. सार्वजनिक वाहतुक व्यवस्था जसेकी, विमान सेवा, रेल्वे, टॅक्सी, ऑटो रिक्षा आणि सार्वजनिक बसेस.
8. विविध देशांच्या परराष्ट्र संबंध विषयक कार्यालयांच्या सेवा.
9. स्थानिक प्राधिकरणाकडून करण्यात येणाऱ्या सर्व मान्सून पूर्व उपक्रम व कामे.
10. स्थानिक प्राधिकरणाव्दारे पुरविणेत येणाऱ्या सर्व सार्वजनिक सेवा .
11. रिझर्व्ह बँक ऑफ इंडीया आणि त्यांच्याकडून अत्यावश्यक सेवा म्हणून घोषित केलेल्या सेवा
12. सेबी तसेच सेबी मान्यताप्राप्त वित्तीय बाजाराशी निगडीत पायाभूत संस्था, स्टॉक एक्सेजेंस, डिपॉझिटर्स, क्लिअरिंग कॉर्पोरेशन्स इत्यादी आणि सेबीकडे नोंदणीकृत इतर मध्यस्थ संस्था.
13. दुरसंचार सेवा सुरू राहणेसाठी आवश्यक अशा दुरूस्ती / देखभाल विषयक बाबी.
14. मालाची / वस्तुंची वाहतुक.
15. पाणीपुरवठा विषयक सेवा.
16. शेती संबंधीत सर्व कामकाज आणि सदर शेती विषयक कामकाज अखंडीत सुरु राहणेसाठी आवश्यक असणारी शेती पुरक सेवा जसे की, बि-बियाणे, खते, उपकरणे याचा पुरवठा आणि दुरुस्ती विषयक कामकाज.
17. सर्व प्रकारच्या व्यापारी मालाची आयात निर्यात.
18. ई कॉमर्स ( फक्त अत्यावश्यक सेवा आणि माल यांच्या पुरवठांशी निगडीत )
19. मान्यताप्राप्त प्रसारमाध्यमे.
20. पेट्रोलपंप आणि पेट्रोलियम संबंधित उत्पादने विषयक सेवा.
21. सर्व प्रकारच्या कार्गो सेवा.
22. डेटा सेंटर, क्लाऊड सर्व्हिस प्रोव्हायडर्स, आयटी -माहिती तंत्रज्ञान महत्वाच्या पायाभूत सुविधा आणि सेवाशी संबंधित, वास्तु विशारद आस्थापना.
23. शासकीय आणि खाजगी सुरक्षा विषयक सेवा.
24. विद्युत आणि गॅस पुरवठा विषयक सेवा.
25. ATM's.
26. पोस्टल सेवा.
27. बंदरे आणि त्या अनुषांगीक सेवा.
28. कस्टम हाऊस एजंट्स, परवानाधारक मल्टी मोडल ट्रान्सपोर्ट ऑपरेटर ( लस/ औषधी / जीवरक्षक औषधांशी संबंधित वाहतूक)
29. अत्यावश्यक सेवेसाठी लागणारा कच्चा माल, पँकेजिंग मटेरीयल यांचे उत्पादन करणारे उद्योग.
30. पावसाळी हंगामासाठी आवश्यक वैयक्तीक व संस्थांसाठी वस्तुचे उत्पादन करणारे घटक सुरु राहतील.

31. स्थानिक आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाव्दारे निश्चित केलेल्या इतर अत्यावश्यक सेवा.

सदरचा आदेश **दिनांक ०७ जून, २०२१** पासून शासनाकडील पुढील आदेश होईतोपर्यंत अंमलात राहील.

अ) उपरोक्त प्रमाणे सुट देण्यात आलेल्या बाबी / आस्थापना / नागरिक यांनी शासनाकडून तसेच स्थानिक प्राधिकारणाकडून वेळोवेळी निर्गमित करणेत आलेले कोविड-१९ वर्तनुकीचे / शिष्टाचाराचे पालन करणे बंधनकारक राहील.

ब) ज्या व्यक्ती / आस्थापना / घटक या कोविड-१९ वर्तनुकीचे / शिष्टाचाराचे पालन करणार नाहीत त्या यापुर्वी निर्ममित करणेत आलेल्या आदेशानुसार दंडास पात्र राहतील. तसेच सदर नियमांचे वारंवार उल्लंघन केल्याचे आढळून आलेस कोविड-१९ विषाणू संसर्ग अधिसूचना अस्तित्वात आहे तो पर्यंत बंद करणेत येईल.

उपरोक्त आदेशाचे पालन न करणाऱ्या कोणतीही व्यक्ती अथवा संस्थेवर भारतीय दंड संहिता १८६० च्या कलम १८८, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ व साथरोग नियंत्रण कायद्यातील तरतुदीप्रमाणे फौजदारी कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी. सोबत संदर्भिय आदेशाच्या प्रती जोडल्या असे.

सदरचा आदेश माझ्या सही व शिक्यानिशी दि. ०५.०६.२०२१ रोजी दिलेला आहे.

जिल्हाधिकारी
पुणे

**(डॉ. राजेश देशमुख)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे**

सोबत – संदर्भ क्र. ११ अधिसुचना प्रत जोडली असे.

**प्रति,**

सर्व नागरिक व आस्थापना पुणे जिल्हा

**प्रत :-**

मा. आयुक्त पुणे व पिंपरी चिचवड महानगरपालिका यांना माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी

**प्रत :-**

१. मा.पोलीस आयुक्त पुणे व पिंपरी चिंचवड यांना माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
२. आयुक्त पी.एम.आर.डि.ए यांना माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
३. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद पुणे यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
४. पोलीस अधीक्षक, पुणे, यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
५. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क,पुणे, यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
६. प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे, यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
७. सहा.आयुक्त,अन्न व औषध प्रशासन, पुणे, यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
८. विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, पुणे, यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
९. प्रादेशिक अधिकारी, म. औ.वि. महामंडळ, पुणे, यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
१०. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, पुणे, यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
११. उपविभागीय दंडाधिकारी (सर्व), यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
१२. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी (सर्व), यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
१३. मुख्याधिकारी (सर्व) नगरपालिका/नगरपरीषद / नगरपंचायत,मुख्य कार्यकारी अधिकारी छावणी परिषद पुणे,खडकी,देहुरोड यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
१४. सर्व गटविकास अधिकारी, यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
१५. जिल्हा माहिती अधिकारी, पुणे यांचेकडे उपरोक्त आदेश जनतेच्या माहितीसाठी पुणे
    २/- जिल्ह्यातील सर्व दैनिक/दृकश्राव्य माध्यमातून ठळक बातमी स्वरुपात प्रसिध्द करुन, प्रसिध्दी अहवाल या कार्यालयास सादर करावा.
१६. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, येरवडा कारागृह, पुणे यांचेकडे महाराष्ट्र राजपत्रामध्ये प्रसिध्दीसाठी व त्याच्या प्रती पुरविणेसाठी रवाना.

प्रत- मा. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग पुणे माहितीसाठी सविनय सादर